Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{{Bi-Monthly}} Volume – IV, Issue – I June 2015

# सामुदायिक विकासात विद्यापीठाची भुमिका

**डॉ. आनंद माधवराव वाघ,**
**सहा. प्राध्यापक,**
**आजीवन शिक्षण व विस्तार विभाग,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

**प्रास्ताविकः-**

मानव हा समाजशील प्राणी आहे. सुरुवातीच्या काळामध्ये मानव हा भटकंती करुन जीवन जगत असे परंतु नंतर जशा मानवाच्या गरजा वाढत गेल्या तसा मानव समूह करुन राहू लागला. जीवनमान सुरळीत जगण्यासाठी मानव समूहाने राहत असे कारण मानवाच्या अनेक गरजा हया समूहाद्वारे पूर्ण होत असत.

समूह म्हणजे समान विचार, समान अधिकार, समान आवडी, निवडी, समान संस्कृती अशा लोकांचा गट म्हणजे समूह अशी समूहाची व्याख्या आपणास सर्वसाधारपणे करता येईल.

**किंग्जले डेव्हिस** :- ''सामाजिक जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करणारा, लहानात लहान अशा एकाच भूप्रदेशात राहणारा गट म्हणजे समुदाय होय. ''

समुदाय म्हणजे एक सामाजिक गटच आहे. कारण समुदायात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला एकमेकांबद्दल आपुलकी व सहकार्याची भावना असते थोडक्यात विचार केला तर व्यक्तीला सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर समुदायात राहणे जास्त उपयुक्त ठरते.

विकास या शब्दाचा विचार केला तर साधारपणे आपणास विकास म्हणजे सर्वांगीन प्रगती असे सांगता येईल. अशी प्रगती की ज्या मुळे लोकांच्या भौतिक व अभौतिक जीवनात परीवर्तन होईल आणि लोकांच्या जीवनाला दिशा मिळेल.

समुदायाला एकत्रित ठेवून सामुदायिक विकास साधने सापे जाईल. लोकांनी आपल्या गरजा ओळखुन त्या पूर्ण करण्यासाठी स्वत: प्रयत्न करणे स्वत:मध्ये योग्य परिवर्तन घडवून आणणे म्हणजे सामुदायिक विकास होय.

सामुदायिक विकासाचे कार्य हे पूर्वीपासुनच चालत आलेले आहे. सामुदायिक विकास हा कोणत्याही क्षेत्रातला असो पण त्याला योग्य दिशा मिळाल्यास योग्य ध्येयापर्यंत पोहचू शकतो. ग्रामीण व नागरी समुदायात वास्तव्य करणाऱ्या सर्व लोकांचा समावेश समाजात होतो. आपले जीवनमान सुधारण्यासाठी व उंचावण्यासाठी लोकांनी सतत प्रयत्न करायला पाहिजेत.

सामुदायिक विकास म्हणजे समुदायाच्या गरजा लक्षात घेणे होय. या गरजा म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, सेवा , रस्ते, पाणी,शेतीसाठी लागणाऱ्या सुविधा, मनोरंजन इत्यादी असु शकतात. म्हणजेच समाजाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती सुधारणे आणि यासाठी स्थानिक लोकांना सहभागी करुन घेऊन योजना आखणे किंवा

विकास कार्यक्रम आखणे यामुळे समुदायाचा विकास साध्य होईल.

**सामुदायिक विकासाच्या व्याख्या**

१. **१९४८ केंब्रिजपरिषद :-** "संपूर्ण समाजाला चांगले राहणीमान मिळवून देणारी ती विशेषतः स्वयंप्रेरणेने चळवळ म्हणजे सामुदायिक विकास होय. "

२. **कार्ल टेलर :-** "ग्रामीण जनतेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्या जनतेने पुढाकार घेण्याची जी प्रक्रिया आहे. त्याला सामुदायिक विकास संबोधतात."

३. **ओ. पी. दहामा :-** "विवक्षित भुभागावर राहणाऱ्या व एकमेकाबद्दल अवलंबुन असलेल्या समुदायातील लोकांच्या संभाव्य क्षमतेचा व गुणांचा विकास घडूवन आणणारी योजना म्हणजे सामुदायिक विकस होय. "

सामाजिक विकासाचा मुख्य उद्देश म्हणजे लोाकांना त्यांच्या कामाकरिता आवश्यक ज्ञान व सेवा उपलब्ध करुन देणे होय.

**सामुदायिक विकासाचे महत्व**

शहरी व ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या सर्व लोकांचा समावेश समुदायात येत असतो. त्यांचे परिवर्तन होणे अत्यंत आवश्यक असते. चांगले परिवर्तन म्हणजे विकास होय. विकास हा विविध क्षेत्रात अपेक्षित आहे. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, नैतिक, शेतीविषयक इत्यादी साठी समुदायातील लोकांनी जर प्रयत्न केला तर विकास साध्य होऊ शकेल. म्हणून सामुदायिक विकासाचे महत्व अनन्य साधारण आहे.

सामुदायिक विकास केल्यामुळे समाजामध्ये जे विविध प्रकारचे वैचारीक गट तयार झालेले असतात ते सामुदायिक विकास करण्याकरिता एकत्र येतात व एकजुटीने कोणतेही कार्य करु शकतात. गरीबी, अज्ञान, बेकारी, शिक्षणाचा अभाव, रुढी, परंपरा, आहाराविषयी अज्ञान या समस्या नष्ट करायच्या असतील तर सामुदायिक विकास होणे अत्यंत महत्वाचे आहे. शेतीविषयक माहिती, तसेच शेती विषयक समस्या यांचे निराकरण देखिल सामुदायिक विकासामार्फतच होऊ शकते.

एकूणच सामाजिक विकासांअतंर्गत लोकांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, शेतीविषयक, आरोग्याविषयक, औदयोगिक, कुटूंब, स्वास्थविषयक समस्या लक्षात आणुन देणे व विकास कार्यक्रमासाठी प्रवृत्त करणे हे काम सामाजिक विकासामुळेच होते.

भारतातील सामुदायिक विकासाची कल्पना महात्मागांधी यांच्या तात्विक विचारावर आधारलेली आहे. थोडक्यात देशाच्या सर्वांगीण विकासात सामुदायिक विकास कार्याचे महत्वपूर्ण स्थान आहे.

समाजाच्या विकासासाठी त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी त्यांना वेगवेगळया सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच त्यांचा सर्वांगीन विकास करण्यासाठी शासनाने वेगवेगळे विभाग करुन तसेच अनेक स्वयंसेवी संस्था संशोधनाचे कार्य

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{{Bi-Monthly}} Volume – IV, Issue – I June 2015

करणाऱ्या संस्था यांच्या मार्फत सामुदायिक विकासाठी अत्यंत महत्वाचे कार्यकरणारी संस्था म्हणजे विद्यापीठ होय. सामुदायिक विकासात विद्यापीठाची अत्यंत महत्वाची भुमिका असते.

**सामुदायिक विकासात विद्यापीठाची भुमिका :-**

भारतातील विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण दिले जाते. उच्च शिक्षण देण्यासाठी विद्यापीठामध्ये तंज्ञ व्यक्ती असतात. हया व्यक्तींच्या ज्ञानाचा व कौशल्याचा वापर साधारण व्यक्तीच्या विकासाकरिता करुन घेण्याचे कार्य मोठया प्रमाणावर विद्यापीठातील विस्तार कार्यक्रमाच्या माध्यमातुन चालत असते. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संशोधन कार्याला अतिशय महत्व देण्यात आले आहे. व हया नवीन शैक्षणिक संशोधनाचा उपयोग विस्तार कार्याच्या माध्यमातुन समाजाचा विकास करण्याकरिता करता येतो. किंवा विद्यापीठ मार्फत विविध उपक्रमाच्या साहयाने समाजापर्यंत पोहचविला जातो. विद्यापीठातील ज्ञानाचा विस्तार जर समाजापर्यंत गेला तर समाजाचा निश्चितच विकास झाल्याशिवाय राहणार नाही.

समाजातील लोकांच्या समस्या सोडविण्याकरिता विद्यापीठातील विविध विभागातील शिक्षकांनी योग्य असे कार्यक्रम आखुन ते लोकांपर्यत पोहचविणे, तसेच प्रौढ व निरंतर शिक्षण विभागाने या करीता विशेष प्रयत्न करुन विविध विभाग, कृषी विभागा मार्फत शेतकाऱ्यांच्या ज्या विविध समस्या आहेत त्या सोडवने गरजेचे आहे तसेच शेतीविषयक नवनविन तंत्रज्ञान व माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहचाविण्यासाठी विद्यापीठातील कृषी विभागाने विविध उपक्रम राबवावेत तसेच कृषी प्रदर्शन सुध्दा भरवावेत. तसेच भित्तीपत्रके काढून ते सार्वजनीक ठिकाणी लोकांना दिसतील अशा पध्दतीने लावावीत त्यामुळे शेतीविषयक बऱ्याच बाबींची माहिती शेतकऱ्यांना होईल जेनेकरुन त्यांच्या समस्या यांचे निराकरण होईल भारतात महाविद्यालय व विद्यापीठ पातळीव अनेक तज्ञ व्यक्ती कार्यरत आहेत. त्या सर्वांचा ग्रामीण विकास कार्यात सहभाग असने गरजेचे आहे. विद्यापीठातील तज्ञ शिक्षकांनी ग्रामीण विकासाच्या दृष्टीने विविध कार्यक्रम राबवायला हवेत. ग्रामीण व शहरी भागातील गरजा लक्षात घेऊन जास्त व्यापक कार्यक्रम घ्यायला हवेत.

ग्रामीण भागातील लोक एकत्र यावेत यासाठी विज्ञान विभागाने विज्ञान क्लब स्थापन करावेत,विज्ञान प्रदर्शने भरवावीत, विज्ञान विषयक परिषदा, चर्चासत्रे, प्रशिक्षण इ. कार्यक्रमांचे आयोजन करावे. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील लोक एकत्र येऊन आपल्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतील.

ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी विज्ञान विभागाने ग्रामीण लोकांचे कौशल्य लक्षात घेऊन त्यांना प्रशिक्षण द्यावे. यात विद्यापीठातील विविध विभाग एकत्र येऊ शकतात. आधुनिक शेती म्हणजे काय ती शेती कोणत्या पध्दतीने करावी त्या करीता कोणकोणती साधन सामुग्री लागते. अन्न पदार्थात भेसळ कशी केली जाते, ती कशी ओळखावी बायोगॅस, तंत्रज्ञान म्हणजे काय, बायोगॅस तत्रज्ञाना विषयी संपूर्ण माहिती, बागकामाविषयी प्रशिक्षण देणे, आधुनिक पध्दतीने काम करणे, पशुचिकित्यालय, कुकुट पालन इत्यादी सर्व माहिती विद्यापीठामार्फत लोकांना दिली जाते.

गृहशास्त्र विभागातर्फे बालसंगोपन म्हणजे काय, बालसंगोपन कसे करावे. बालसंगोपनाच्या आधुनिक पध्दती,

स्तनपानाचे फायदे, लसीकरण करण्याचे फायदे, गृहव्यवस्थापन, बँकाबाबत माहिती, कौटुंबिक अंदाजपत्रक, ग्राहक जागरुकता,आहार विषयक, आहार व आरोग्य यांचा संबंध इ. माहिती लोकांना दिली जावु शकते.

पर्यावरणशास्त्र विभागामार्फत पर्यावरण म्हणजे काय ? पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचे फायदे कोणकोणते आहेत. पर्यावरणाची हाणी केल्यामुळे होणारे परिणाम हया सर्व बाबींची माहिती ग्रामीण व शहरी लोकांना पर्यावरण विभागामार्फत दिली जाते.

अशा प्रकारे विद्यापीठातील विविध विभागामार्फत सामुदायिक विकास करण्याकरिता आपणास फायदा होऊ शकतो.

विद्यापीठाने दिलेल्या प्रशिक्षणाचा फायदा नोकरी किंवा व्यवसाय करण्याकरिता झाला पाहिजे. त्यामुळे लोकांना उत्पन्न मिळेल व त्यांचा विकास होण्यास मदत होईल.

विद्यापीठामार्फत विविध क्षेत्रातले व्यवसाय उदाः दुग्ध व्यवसाय, रेडीओ, टी. व्ही. दुरुस्ती, पर्यटन, आंतरीक सजावट, बांधकाम, इलेक्ट्रॉनिक उपकरणांची दुरुस्ती, फोटाग्राफी, फॅशन, डिझायनिंग, कृषिविषयक, मत्स्य व्यवसाय, अन्नसंरक्षण, शिवणकाम, विणकाम, भाज्यांची लागवड, इत्यादी विषयासंदर्भात प्रशिक्षण दिल्यास त्यांच्या उदरनिर्वाहासाठी मदत होईल व त्यांचा विकास होईल.

विस्तार शिक्षणाद्वारे सेवांतर्गत प्रशिक्षणाची अमंलबजावणी चांगल्या प्रकारे झाली पाहिजे.

**समारोप**

वरील सर्व बाबींचा विचार केला असता आपल्या असे लक्षात येते की, सामुदायिक विकासात विद्यापीठाची भुमिका ही अत्यंत महत्वाची अशी आहे विद्यापीठाच्या माध्यमातुन लोकांना ज्ञान, माहिती व कौशल्य देण्याचे कार्य झाले पाहिजे. त्यामुळे व्यक्तीचा व समाजाचा विकास होत असतो.

विद्यापीठामार्फत व्यक्तीना प्रशिक्षण व विकासाशी संबंधीत नवीन व परिपूर्ण माहिती देणे तसेच ग्रामीण भागातील लोकांपर्यत माहिती पोहचविण्याचे कार्य विद्यापीठांनी करने गरजेचे आहे.

विद्यापीठामार्फत सरकारी विकासात्मक कार्यामध्ये लोकांना सहभागी करण्या करिता लोकांची मानसिकता तयार केली पाहिजे. तसेच समुदायाच्या समस्याची माहिती करुन घेऊन त्या सोडविण्या करिता विद्यापीठामार्फत संशोधन केले पाहिजे व त्यातुन मिळणारे निष्कर्ष हे समुदाया पर्यंत पोहोचले पाहिजेत.

सर्वसामान्यव्यक्ती व विविध सरकारी विभागामध्ये स्नेहसंबंध प्रस्थापित करण्याचे काम विद्यापीठामार्फत झाले. एकूणच सर्व बाबींचा विचार केला असता आपल्या असे लक्षात येते की, समाजातील गरजा ओळखणे, त्यांच्या विकासाकरीता योग्य प्रशिक्षण कार्यक्रम आखणे, वैयक्तिक व सामुहिक पातळीवर प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे, रोजगार उपलब्ध करुन देणे. त्या करिता योग्य मार्गदर्शन करणे, विकासाच्या कार्यक्रमामध्ये सक्रीय सहभाग करुन घेणे. या सर्व

जबाबदाऱ्या सामुदायिक विकासासाठी विद्यापीठातील तज्ञ व्यक्तीच्या आहेत. म्हणजेच सामुदायिक विकासात विद्यापीठाची भुमिका अत्यंत महत्वाची अशी आहे.

**संदर्भग्रंथ**

१. सामाजिक समस्या - प्रा. सौ. सुमन पाटे
२. ग्रामीण समाजशास्त्र - प्रा. डॉ. भा. कि. खडके
३. सामुदायिक विकास विस्तार शिक्षण - प्रा. बी. बी. तिजारे
४. सामुदायिक विकास आणि विस्तार कार्याची मुलतत्वे - प्रा. चंद्रशेखर लाखे
५. विस्तार शिक्षण - सोपान वि सुपे
६. ग्रामीण व नागरी समाजशास्त्र - डॉ. बी. एस. कऱ्हाडे
७. आधुनिक भारताच्या समस्या - प्रा. प्र. ल बनसोड व स. ज. चराटे
८. सामुदायिक विकास व विस्तार शिक्षण - डॉ. सौ. उज्वला किशोर वैरागडे, प्रा. सौ. विघुल्लता मुळे/कुलकर्णी